Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
**दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,**
**www.unishivaji.ac.in**

# विद्यार्थी विकास विभाग

**Dr. P. T. Gaikwad**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

जा. क्र. शिवाजी वि/विद्यार्थि विकास/२००१ — दि. : ३०/०१/२०२४

प्रती,

मा. अधिविभाग प्रमुख / संचालक / समन्वयक,
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : **शिवस्पंदन कार्यक्रम बदललेल्या तारखा कळवणेबाबत**

संदर्भ : १) या कार्यालयाचे जा. क्र. १९३७ दि. १९/१२/२०२३ रोजीचे पत्र
२) या कार्यालयाचे जा. क्र. १९५९ दि. ०१/०१/२०२४ रोजीचे पत्र
३) या कार्यालयाचे जा. क्र. १९७६ दि. १३/०१/२०२४ रोजीचे पत्र
४) या कार्यालयाचे जा. क्र. १९८८ दि. १६/०१/२०२४ रोजीचे पत्र

महोदय / महोदया ,

उपरोक्त विषय संदर्भात या विभागामार्फत आयोजित शिवस्पंदन कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवण्यासाठी दि. २०/०१/२०२४ हि अंतिम तारीख कळवण्यात आली होती. परंतु शिवस्पंदन कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवण्यासाठी अंतिम तारीख दि. ३१/०१/२०२४ हि करण्यात आली आहे. याची नोंद घ्यावी. तसेच शिवस्पंदन कार्यक्रमाच्या तारखामध्ये बदल करण्यात आला आहे. शिवस्पंदन कार्यक्रमाच्या नवीन तारखा **दि. २१ फेब्रुवारी ते दि. २३ फेब्रुवारी, २०२४** अश्या ठरल्या आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

शिवस्पंदन कार्यक्रमाचे वेळापत्रक पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कला प्रकार | दिनांक | स्थळ | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | सुगम गायन, एकल लोकवाद्यवादन, समूह गीत | २१/०२/२०२४ | वि. स. खांडेकर भाषा भवन | सकाळी ९.०० ते सांयकाळी कार्यक्रम संपेपर्यंत |
| २. | मूकनाट्य, नकला, लघुनाटिका | २२/०२/२०२४ | वि. स. खांडेकर भाषा भवन | |
| ३. | एकल नृत्य, समूह नृत्य, बक्षिस वितरण समारंभ | २३/०२/२०२४ | राजमाता जिजाऊ सभागृह | |

तसेच **दि. २३ फेब्रुवारी, २०२४** रोजी **लोकवाद्य वादनाचा कार्यक्रम हि** आयोजित करण्यात येणार आहे. तरी आपणास आदेशान्वये कळवण्यात येते कि, सदर कालावधी मध्ये आपल्या अधिविभागातील इतर कोणतेही कार्यक्रम, परीक्षा तसेच आपल्या अधिविभागाची शैक्षणिक सहल आयोजित करू नये व आपल्या अधिविभागातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे हि विनंती.

सदर कार्यक्रमाच्या खर्चासाठी प्रत्येक **अधिविभागास रु. ५,०००/- इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.** जे अधिविभाग शिवस्पंदन कार्यक्रमामध्ये भाग घेतील त्यांनी सदर कार्यक्रमासाठी लागणारे **ड्रेपरी भाडे, मेकअपसाहित्य, साथीदार मानधन, लेखक मानधन, वाद्य भाडे** इ. किरकोळ खर्च सदर मंजूर निधीमधून करावयाचा आहे व कार्यक्रम संपल्यानंतर बिले त्वरित या विभागास सादर करावयाची आहेत. सदर बिले प्रशासकीय मान्यतेने लेखा विभागाकडे पाठवण्यात येतील व त्यानंतर मंजूर बिलाची रक्कम संबधित व्यक्तींना मिळेल.

कळावे,

आपला विश्वासू

संचालक